शासकीय,निमशासकीय किवा खाजगी जमिनीवरील अनधिकृत झोपडपट्टया व अन्य बांधकामे पावसाळयात न तोडण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २००५/प्र.क्र.५७/ज-१
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक : १५ जुलै २००५

वाचा:

१) शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग,क्र.२०००/प्र.क्र.१३९/ज-१, दिनांक १५ सप्टेंबर २००१.

२) शासन परिपत्रक, नगरविकास विभाग क्र.अनबां १००५/७०३/प्र.क्र.१०५/ २००५, नवि-३०, दिनांक ३१ मे,२००५.

परिपत्रक:

शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग,क्र.संकीर्ण २०००/प्र.क्र.१३९/ज-१, दिनांक १५ सप्टेंबर २००१ अन्वये शासकीय निमशासकीय किंवा खाजगी जमिनीवरील कोणती अनधिकृत झोपडपट्टया व अन्य बांधकामे पावसाळयात देखील तोडण्याबाबत स्वयंस्पष्ट सूचना दिल्या आहेत. या सूचनांचा येथे पुनरुच्चार करण्यात येत आहे.

पुढे दर्शविलेल्या प्रकरणामध्ये अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही न थांबविता चालू ठेवावी :-

१) प्रत्यक्ष वापरात नसलेली निवासी बांधकामे / निवासी झोपडपट्टया व अन्य अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे पावसाळयात देखील तोडण्यात यावीत.

२) पावसाळयाचा फायदा घेवून होत असलेली सर्व प्रकारची अनधिकृत बांधकामे/ झोपडया/अतिक्रमणे तात्काळ पाडण्यात यावीत.

३) बृहन्मुंबईत तसेच अन्य शहरात ज्या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी पावसाळयाच्या कालावधीत जागा मोकळी करणे अपरिहार्य आहे,अशा जागांवरील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे झोपडया तात्काळ हटविण्यात याव्यात.

४) ज्या प्रकरणी अनधिकृत बांधकामे / झोपडया / अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत न्यायालयाचे आदेश आहेत अशा प्रकरणी सदर अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात यावीत.

५) वन जमिनीवरील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे / झोपडया तात्काळ हटविण्यात याव्यात.



12 AUG 2005

2

२. वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची कृपया दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा. शं. नागरे)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति

सर्व विभागीय आयुक्त,